पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र.८५१९/२००६ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार अनधिकृत प्रार्थना स्थळांचे बांधकाम पाडणे/नियमित करण्यासंबंधाने निकष ठरविण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांकः-सीटीएम-०९०९/प्र.क्र.५५८(भाग-२)/विशा-१ब

गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांकः- ४ ऑक्टोबर,२०१०

**वाचा:-**१) शासन निर्णय गृह विभाग क्रमांकः-सीटीएम-०९०९/प्र.क्र.५५८/भाग-२/विशा-१ब दिनांक २१.७.२०१०.

२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः-सीटीएम-०९०९/प्र.क्र.५५८/भाग-२/विशा-१ब दिनांक ३१.७.२०१०

**शासन निर्णयः**-सार्वजनिक/शासकीय जागेवरील अनधिकृत प्रार्थनास्थळांची बांधकामे पाडून टाकणे/नियमित करणे यासंबंधात उपरोक्त नमूद प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२९.९.२००९ व त्यानंतर दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने त्यासंबंधात ठरवावयाच्या निकषाबाबत शिफारशी करण्यासाठी दि.२१.७.२०१० च्या उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीचे गठन करण्यात आले होते. या उपसमितीने त्यांच्या शिफारशी शासनास सादर केल्या असून, त्यानुसार यासंबंधाने पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

(१) शासकीय/सार्वजनिक जागेवर करण्यात आलेली धार्मिक वास्तूंची अतिक्रमणे खालील प्रकारात मोडत असतील तर ती पूर्णपणे काढून टाकण्यात यावीत. त्यासाठी शासनाकडे संदर्भ करण्याची गरज नाही.

अ) वाहतुकीस अडथळा ठरणारी रस्ता व पदपथावरील अतिक्रमणे

ब) आवश्यक सेवांसाठी/प्रकल्पांसाठी आरक्षित भूखंडावरील अतिक्रमणे.

क) शासकीय कार्यालये,हॉस्पिटल्स, शैक्षणिक उपक्रम सार्वजनिक उपयोगी सेवा, शासकीय किंवा निमशासकीय वास्तू (Installations) वरील अतिक्रमण.

(२) सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंडावरील इतर धार्मिक अतिक्रमणांबाबत प्रकरण निहाय आढावा घेवून निर्णय घेण्यात यावा.

(३) प्राचीनता ( Antiquity), परंपरा (Tradition), भावना/संवेदनशीलता (Sensitivity), इतिहास (History) लक्षात घेता जे सार्वजनिक/सरकारी जागेवरील धार्मिक स्थळांचे अतिक्रमण काढणे उचित ठरणार नाही असे धार्मिक स्थळ शासकीय किंवा खाजगी जागेत इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत विचार व्हावा.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक क्र.- ४९३८२
15 OCT 2010

(४) इतर शासकीय जागेत असलेल्या धार्मिक स्थळांबाबत त्यांची प्राचीनता, लोकांच्या भावना व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न विचारात घेवून त्यांना काढण्याबाबत/स्थलांतरीत करण्याबाबत किंवा नियमित करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

(५) धार्मिक अतिक्रमण नियमित करणे किंवा काढून टाकणे याबाबतचे अधिकार राज्य शासनाकडे राहतील. क्षेत्रिय अधिका-यांकडून प्राप्त प्रत्येक अतिक्रमणाबाबतच्या अहवालांची जिल्हास्तरावरील समितीने बारकाईने छाननी करावी. त्यानंतर समितीने अशी छाननी करुन राज्यस्तरीय संनियंत्रण समितीला धार्मिक वास्तुंचे नियमितीकरण किंवा स्थलांतरण करण्याबाबत अहवाल सादर करावा. शासन स्तरावर निर्णय झाल्यानंतर कार्यवाहीसंबंधी मासिक अहवाल क्षेत्रीय समितीने राज्यस्तरीय संनियंत्रण समितीला नियमितपणे पाठवावा.

वरील अनुक्रमांक ३,४,५ येथे नमूद अतिक्रमणाबाबत शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर या समितीचे अध्यक्ष भारत सरकारचे इतर विभाग, परिरक्षण विभाग, रेल्वे व इतर संस्थांना त्यांचे हद्दीतील अतिक्रमणे काढण्याबाबत सूचना देतील व आवश्यक ते सहकार्य करतील.

२. सार्वजनिक ठिकाणावरील धार्मिक वास्तुच्या अतिक्रमणांबाबत आढावा घेवून निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे समित्या नियुक्त करण्यात येत आहेत:-

**अ) मुंबई (शहर/उपनगरे), पुणे, ठाणे, नागपूर नाशिक, अमरावती, औरंगाबाद** या जिल्हयांकरिता समिती-

| | | |
|---|---|---|
| १) आयुक्त, महानगरपालिका | -- | अध्यक्ष |
| २) पोलिस आयुक्त | -- | सदस्य |
| ३) जिल्हाधिकारी | -- | सदस्य |
| ४) एम.आय.डी.सी./एम.एम.आर.डी.ए./ एन.आय.डी./सिडको/म्हाडा/कँटोमेंट बोर्डस् अन्य स्थानिक विशेष नियोजन प्राधिकरण/रिल्वे/इ.चे अधिकारी. | -- | सदस्य |
| ५) निवासी उपजिल्हाधिकारी | -- | सचिव |

**ब) इतर जिल्हयांकरिता समिती -**

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | -- | अध्यक्ष |
| २) पोलिस अधिक्षक | -- | सदस्य |
| ३) मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हापरिषद | -- | सदस्य |
| ४) कँटामेंट बोर्ड-महानगरपालिका/नगरपालिका एम.आय.डी.सी./एस.टी.महामंडळ/रेल्वे/अन्य स्थानिक प्राधिकरणाचे अधिकारी | -- | सदस्य |
| ५) निवासी उपजिल्हाधिकारी | -- | सचिव |

**टीपः-** सदर समितीचे अध्यक्ष हे आवश्यकतेप्रमाणे इतर अधिका-यांना आमंत्रित करतील.

३. अतिक्रमणे काढून टाकण्याबाबत पाळावयाच्या कार्यपध्दतीबाबत महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक -जमिन-०९०६/प्र.क्र.७६/ज-१, दिनांक १५.९.२००६ मध्ये दिलेल्या सूचनांचे सर्व संबंधीत अधिका-यांनी पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनुसार व नांवाने,

( दत्तात्रय बो-हाडे)
अवर सचिव,गृह विभाग (विशेष)
महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राज भवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग.
अपर मुख्य सचिव, महसुल विभाग.
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग.
प्रधान सचिव (अ व सू) यांच्या स्वीय सहायक.
प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग.
सचिव, नगर विकास विभाग.
सचिव, ग्राम विकास विभाग.
मा.मुख्य सचिवांचे सचिव.
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हा अधिकारी.
सर्व पोलिस आयुक्त.
सर्व पोलिस अधिक्षक.
मा.मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव.
निवडनस्ती (कार्यासन विशेष शाखा-१(ब))